
# राज्यातील अधिकारी/शिक्षक/कर्मचारी यांच्यासाठी एम एस वर्ड एक्सेल स्पर्धा

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील शासकीय स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित शाळा (इयत्ता १ ते १२) संबंधित अधिकारी/शिक्षक/कर्मचारी यांचेसाठी विविध स्तरावर एम एस वर्ड व एक्सेल स्पर्धा घेण्यात येत आहे. या उपक्रमातून अधिकारी/शिक्षक/कर्मचारी यांच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामासाठी आवश्यक असलेल्या डिजिटल कौशल्यांचा विकास होईल. या स्पर्धांमुळे दस्तऐवज निर्मिती, अहवाल लेखन, डेटा व्यवस्थापन, मार्कशीट आणि बजेट तयार करणे यांसारख्या कामांमध्ये कार्यक्षमता वाढेल.

**उद्दिष्ट्ये :** स्पर्धेची उद्दिष्टे खालील प्रमाणे

1. शिक्षकांना दैनंदिन शालेय कामकाजात एम एस वर्ड वापरण्यास प्रोत्साहित करणे.
2. संगणकाचा वापर करून शाळा आणि विद्यार्थी संबंधित दस्तऐवज यांचे संवर्धन करणे.

**स्पर्धेची प्रक्रिया व वेळापत्रक**




**तालुकास्तर**

प्रत्येक केंद्रातून एक शिक्षक याप्रमाणे नाव नोंदवेल. एकापेक्षा जास्त शिक्षक एकाच स्पर्धेत सहभागी होण्यास इच्छुक असतील तर केंद्रप्रमुख निवड करतील.

दिनांक, ठिकाण व वेळ ठरवून स्पर्धा होईल शिक्षकांनी स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहून सादरीकरण तयार करणे, सॉफ्ट कॉपी जमा करणे निवड समितीमार्फत मूल्यमापन होऊन एक विजेता विभागस्तरावर पुढे जाईल.

**विभाग स्तर**

तालुकास्तरावरील पाच विजेत्यांची विभाग स्तरावर स्पर्धा

तालुक्याप्रमाणेच सादरीकरणाची प्रक्रिया मूल्यांकन व एक विजेता राज्यस्तरावर पुढे जाईल.

**राज्यस्तर**

विभाग स्तरावरील विजेत्यांचे सादरीकरण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्याकडे पाठवले जाईल राज्यस्तर समिती 20 विजेते निवडेल कोणत्याही स्तरावरील निवड समितीचा निर्णय अंतिम असेल पुनरावृत्ती हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

**स्पर्धकांनी आपला वैयक्तिक लॅपटॉप सोबत आणणे.**

**अ)एम एस वर्ड स्पर्धा**

**महत्त्वाचे नियम**

- प्रत्येक शिक्षकाने स्पर्धेच्या ठिकाणी स्वतः सादरीकरण करणे आवश्यक.
- सहभागी शिक्षकांनी आपल्या सादरीकरणात सुरुवातीला खालील माहिती नोंदवावी.
- पद, नाव, पदनाम, शाळेचे कार्यालयाचे नाव, केंद्र, तालुका, जिल्हा यु डायस कोड, शालार्थ/ सेवार्थ आयडी, मोबाईल क्रमांक
- भाषेचा पर्याय मराठी, इंग्रजी किंवा हिंदी
- सादरीकरणासाठी आवश्यक माहिती स्पर्धेच्या वेळी पुरवण्यात येईल.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 तसेच शैक्षणिक विषयावर आधारित एक डॉक्युमेंट तयार करणे.
- उदा. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शालेय संरचना, निपुण भारत, शैक्षणिक प्रकल्प अहवाल, लेसन प्लान, माहितीपत्रक, अहवाल इ.
- **सूचना : MS वर्डचे जास्तीत जास्त आणि प्रगत फीचर्स वापरून डॉक्युमेंट तयार करणे**
- **वेळेची मर्यादा**

  स्पर्धेसाठी एक तासाचा वेळ असेल या वेळेतच आपले डॉक्युमेंट पूर्ण करणे आवश्यक आहे.

- **शब्दमर्यादा**

  डॉक्युमेंटमधील शब्दांची मर्यादा कमीत कमी २०० व जास्तीत जास्त ५०० शब्दांपर्यंत असावी.

- **विषय किंवा सूचना**

  स्पर्धेसाठी एक विशिष्ट विषय किंवा काही सूचना दिल्या जातील आपल्या डॉक्युमेंट त्या विषयाला धरून आणि सूचनानुसार असावे.

- **मूल्यांकनाचे निकष**

  आपले डॉक्युमेंट कोणत्या आधारावर तपासले जाईल याचे निकष स्पष्ट केले जातील. उदाहरणार्थ फॉरमॅटिंग, अचूकता, डिझाईन, टेबल आणि चार्टचा वापर मेल मर्ज इत्यादी.

- **फॉन्ट आणि फॉन्टचा आकार**

  डॉक्युमेंटमधील अक्षरांचा फॉन्ट मराठी साठी गुगल इनपुट, युनिकोड, इंग्रजीसाठी Times New Roman चा वापर करावा. फॉन्टचा आकार १२ असावा.

- **मार्जिन आणि स्पेसिंग**

  (पानांचे मार्जिन)Top-१, Bottom-१ , Left-१५.,Right- १) दोन ओळींमधील अंतर १.१५ असावे.

- **हेडर आणि फुटर**

  डॉक्युमेंटमध्ये हेडर आणि फुटरचा वापर करावा.यामध्ये विषयाचे नाव, पृष्ठ क्रमांक ,संस्थेचे नाव इ. चा समावेश असावा.

- **स्पेलिंग आणि व्याकरण**

  डॉक्युमेंटमध्ये स्पेलिंगची आणि व्याकरणाची कोणतीही चूक नसावी.

- **टेबल आणि चार्ट**

  टेबल आणि चार्ट आवश्यकतेनुसार टेबल आणि चार्टचा योग्य वापर करणे अपेक्षित आहे.

- **इमेजेस चा वापर**

  डॉक्युमेंट मध्ये इमेज वापरायची असल्यास ते कॉपीराईट मुक्त असली पाहिजे.

- **फाईल फॉरमॅट**

  तयार केलेली फाईल डॉक्युमेंट स्वरूपात व पीडीएफ स्वरूपात सेव्ह करायची आहे.

**याशिवाय आवश्यक तिथे शिक्षक अधिकारी/ कर्मचारी मार्गदर्शिकेत दिलेल्या निकषांचा वापर करावा. उदा. मेल मर्ज, टिपण्या (comments),, संदर्भ, फुटनोटस्, टेबल्स इ.**

**कोणत्याही गैरमार्गाचा वापर झाल्यास स्पर्धेतून बाद करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

**मूल्यांकन निकष व सविस्तर गुणांकन तक्ता**

**मूल्यांकन निकष (एकूण गुण : १००)**

| **अ.क्र.** | **मूल्यांकन निकष** | **गुण** |
|---|---|---|
| १) | डॉक्युमेंट फॉरमॅटिंग (Document Formatting) | २० |
| २) | आशयाची अचूकता आणि सुसंगतता (Accuracy and consistency of content) | २० |
| ३) | MS-Word Features चा प्रभावी वापर (Effective use of MS-Word Features) | २० |
| ४) | वेळेचे व्यवस्थापन (Time Management) | २० |
| ५) | एकूण सादरीकरण (Overall presentation) | २० |

## ब) एम एस एक्सेल स्पर्धा

**महत्त्वाचे नियम**

- प्रत्येक शिक्षकाने स्पर्धेच्या ठिकाणी स्वतः सादरीकरण करणे आवश्यक.
- सहभागी शिक्षकांनी आपल्या सादरीकरणात सुरुवातीला खालील माहिती नोंदवावी.
- पद, नाव, पदनाम, शाळेचे कार्यालयाचे नाव, केंद्र, तालुका, जिल्हा युडायस कोड, शालार्थ/ सेवार्थ आयडी, मोबाईल क्रमांक
- भाषेचा पर्याय मराठी, इंग्रजी किंवा हिंदी
- सादरीकरणासाठी आवश्यक माहिती स्पर्धेच्या वेळी पुरवण्यात येईल.
- **वेळेची मर्यादा**

  स्पर्धेसाठी एक तासाचा वेळ असेल या वेळेतच आपले कार्य पूर्ण करणे आवश्यक आहे

- **विषय किंवा सूचना**

  स्पर्धेसाठी एक विशिष्ट विषय किंवा काही सूचना दिल्या जातील आपल्या डॉक्युमेंट त्या विषयाला धरून आणि सूचनानुसार असावे.

**विषय : शालेय शिक्षणाशी संबंधित Data देण्यात यावा.**

**DATA तयार करण्यासाठी विषय :**

**विद्यार्थ्यांचे गुण आणि विश्लेषण, करणे.**

**विषयाशी संबंधित दिलेल्या सूचनांनुसार माहितीचे विश्लेषण करणे.**

**(महत्वाची सूचना : DATA आणि विश्लेषण करणे संबंधीच्या सूचनेचे शीट स्पर्धेच्या दिवशी आयोजक जिल्ह्याकडून दिले जाईल.)**

**मूल्यांकन निकष व सविस्तर गुणांकन तक्ता**

**मूल्यांकन निकष (एकूण गुण : १००)**

| अ.क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| १) | डेटा एन्ट्री आणि व्यवस्थापन (Data Entry and management) | २० |
| २) | फॉर्म्युले आणि फंक्शन्सचा वापर( Use of Formulas and Functions) | २० |
| ३) | डेटा विश्लेषण आणि व्हिज्युअलाझेशन (Data analysis and Visualization) | १५ |
| ४) | ऑटोमेशन आणि कार्यक्षमता (Automation and Efficiency) | १५ |
| ५) | समस्या सोडविण्याची क्षमता (Problem Solving Ability) | १५ |
| ६) | सादरीकरण आणि सुस्पष्टता (Presentation and Clarity) | १० |
| ७) | वेळेचे व्यवस्थापन (Time Management) | ०५ |

एम एस वर्ड व एक्सेल स्पर्धेचे मूल्यमापन -

- तालुकास्तरावर असलेल्या समितीच्या मार्गदर्शनाखाली निवडलेल्या परीक्षकांमार्फत करण्यात येईल .
- विभागस्तरावर असलेल्या समितीच्या मार्गदर्शनाखाली निवडलेल्या परीक्षकांमार्फत करण्यात येईल .
- राज्यस्तरावर असलेल्या समितीच्या मार्गदर्शनाखाली निवडलेल्या परीक्षकांमार्फत करण्यात येईल .

मूल्यमापन केल्यानंतर विविध समित्यांनी स्पर्धकांनी सर्व जमा केलेल्या फाइल्स जतन करून ठेवाव्या. प्रत्येक टप्प्यावर समितीने केलेले मूल्यांकन अंतिम मानले जाईल.

**मूल्यमापन :**

**एम एस वर्ड व एक्सेल स्पर्धा झाल्यानंतर दोन्ही स्पर्धेचे वेगवेगळे गुणांकन करून क्रमवारी निश्चित करण्यासाठी दोन्ही स्पर्धेच्या गुणांची सरासरी काढावी.**

**MS Word व MS Excel सादरीकरण नियोजन**

| अ.क्र. | वार व दिनांक | स्पर्धेचे नाव | आयोजक जिल्हा | नोव्हेंबर तालुकास्तर | डिसेंबर विभागस्तर | जानेवारी राज्यस्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | तिसरा शुक्रवार | MS Word व MS Excel सादरीकरण स्पर्धा | बीड | नोव्हेंबर अखेरपर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज. प्रत्येक स्पर्धेतील विजेता निवडणे. | डिसेंबर अखेरपर्यंत कॉलम २ मधील दिवसांपर्यंत पूर्ण करावा. याचे कामकाज प्रत्येक स्पर्धेतील पाच विजेता निवडणे. | जानेवारी अखेरपर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज प्रत्यक्ष स्पर्धेतील 10 विजेता निवडणे |

.